**ठळक बातम्या**

- राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध, गेल्या महिनाभरात साठेबाजांकडून साडे ३ हजारांपेक्षा जास्त सिलिंडर जप्त

- खरीप हंगामसाठी राज्याला खतांचा पुरेसा कोटा, हंगाम सुरू होण्यापूर्वीच निम्म्याहून अधिक साठा तयार करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न

- बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपली, प्रमुख पक्षांच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**आणि**

- रामदास आठवले, शरद पवार यांच्यासह राज्यसभेच्या नवनियुक्त सदस्यांचा शपथविधी

<><><><><>

राज्यात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून काळा बाजार, साठेबाजी यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती राज्याचे रेशन नियंत्रक चंद्रकांत डांगे यांनी आज दिली.

**- -- बाइट - चंद्रकांत डांगे ----**

जानेवारी ते मार्च दरम्यान राज्यात पेट्रोल, डिझेल, एलपीजीचा जितका सरासरी पुरवठा होत होता तितकाच पुरवठा सध्याही सुरू असल्याचं त्यांनी आकडेवारीद्वारे स्पष्ट केलं. राज्यातल्या स्थलांतरित मजुरांची संख्या पाहता ५ किलो वजनाच्या अतिरीक्त २५ टक्के सिलिंडरची मागणी केंद्र सरकारकडे केली आहे. त्याचप्रमाणे ऑटो एलपीजीसाठी पुरवठा कोटा वाढवून द्यायची मागणी केल्याचंही डांगे म्हणाले. ज्या भागात पाइप गॅसची सोय उपलब्ध आहे तिथल्या ग्राहकांनी एलपीजी ऐवजी पाइप गॅसची जोडणी घ्यावी. ३० जूननंतर त्यांना एलपीजी पुरवठा होणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. ग्रामीण भागात रॉकेलच्या पुरवठ्याला सरकारनं प्राधान्य दिलं असून प्रत्येक कुटुंबाला ३ लिटर रॉकेल देण्याचे आदेश सरकारनं दिले आहेत. या आठवड्यात सर्वत्र रॉकेल उपलब्ध होईल, अशी माहिती डांगे यांनी दिली.

यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्र सरकारनं राज्याचा खताचा कोटा ४८ लाख ८० हजार मेट्रीक टन केला आहे. गेल्यावर्षी हा कोटा ४४ लाख ७० हजार टन होता अशी माहिती राज्याचे कृषी संचालक सुनील बोरकर यांनी दिली. एकूण कोट्यापैकी सुमारे ५२ टक्के खतं राज्यात उपलब्ध आहेत आणि येत्या २ महिन्यात आणखी बफर साठा निर्माण करण्याचे प्रयत्न आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

देशात अन्नधान्याचा पुरेसा साठा असल्याची ग्वाही केंद्र सरकारने दिली आहे. देशात डाळींचं उत्पादन गेल्या वर्षीपेक्षा जास्त झालं आहे, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत फारसे चढ उतार झालेले नाहीत,आणि सरकारचं पुरवठा आणि किमतींवर बारकाईने लक्ष आहे, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव अनुपम मिश्रा यांनी सांगितलं. अन्न आणि नागरी पुरवठा विभागाच्या संयुक्त सचिव सी. शिखा यांनी सांगितलं की, देशात गहू आणि तांदळाचा पुरेसा साठा आहे. एकूण ६०२ लाख टन अन्नधान्य सध्या उपलब्ध आहे, तसंच खाद्यतेलाचा साठाही पुरेसा आहे, असं सांगून त्या म्हणाल्या, की खाद्यतेलाची आयात नेहमीप्रमाणे सुरळीत आहे.

**<><><><>**

बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. बारामतीत सुनेत्रा पवार आणि आकाश मोरे यांनी तर राहुरीत अक्षय कर्डिले आणि गोविंद मोकाटे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून..

**व्हीसी**

*(बारामतीची पोटनिवडणूक ही वैयक्तिक नसून अजित पवार यांच्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाची असल्याची भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी अर्ज दाखल करताना व्यक्त केली. काँग्रेसनं बारामतीतून प्रदेश सचिव आकाश मोरे यांचा उमेदवारी अर्ज भरला आहे.*

*ही निवडणूक बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी प्रयत्न सुरू असल्याचं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितलं. अजित पवार यांच्यासोबत काम केलेल्या काँग्रेस नेत्यांनी जनभावनेचा आदर करून ही निवडणूक बिनविरोध होऊ द्यावी असं आवाहन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी आमची*

*अपेक्षा आहे, मात्र तरीही निवडणूक लढवण्याची वेळ आली तर मैदानात उतरून पूर्ण ताकदीने लढावं असं आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांनं देखील ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी पाठिंबा दिला आहे. अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एफआयआर दाखल केला तर बारामती विधानसभा निवडणुकीच्या पोटनिवडणुकीसाठीच्या काँग्रेस उमेदवाराचा अर्ज मागे घेता येईल, असं काँग्रेसनं स्पष्ट केलं आहे. निवडणुकीत राजकीय पक्षाने उमेदवार देणं यात काही चुकीचं नाही. तो त्यांचा निर्णय आणि राजकीय अधिकार आहे, त्यावर फार चर्चा करण्याचं कारण नाही, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिली आहे. निवडणूक बिनविरोध घ्या अशी मागणी करण्याचंही काही कारण नाही. कारण लोकशाहीत तुम्हाला जेव्हा निवडणूक लढवायची असेल तेव्हा समोर कुणीतरी उमेदवार असेल, हे मान्य करूनच ती लढायला हवी, असंही ते म्हणाले.*

*राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेसाठी भाजपानं शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गोविंद मोकाटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्राजक्त तनपुरे यांची भेट घेतली. त्यानंतर प्राजक्त तनपुरे निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. दोन्ही ठिकाणी नामांकन अर्जांची छाननी उद्या होणार असून अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ एप्रिल आहे. मतदान २३ एप्रिल रोजी तर मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.)*

**<><><><><>**

राज्यसभेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी आज झाला. केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले, माजी केंद्रीय मंत्री शरद पवार, ज्योती वाघमारे, माया इवनाते, रामराव वडकुते या महाराष्ट्रातून निवडून गेलेल्या सदस्यांचा त्यात समावेश आहे. राज्यसभेचे अध्यक्ष या नात्याने उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी सदस्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

मुंबईच्या गोरेगाव उपनगरात काल रात्री दोन गटात झालेल्या हाणामारीत तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दहा जणांना अटक केली असून त्यानंतर

मुंबई महानगर पालिकेनं तातडीनं त्यातल्या एका आरोपीच्या घराचं अनधिकृत बांधकाम तोडलं. धार्मिक गाणी जोरानं वाजवल्यावरुन दोन गटात हा वाद झाला होता.

<><><><><>

नांदेड जिल्ह्यात गुन्हेगारी टोळ्यांमधल्या संघर्षातून गेल्या तीन दिवसात पाच जणांची हत्या करण्यात आली आहे. गेल्या शुक्रवारी मध्यरात्री नांदेड शहरात दोन टोळ्यांमधल्या संघर्षात तीन जण ठार झाले तर शहरातल्या अन्य भागात एकाची हत्या करण्यात आली. आज पहाटे साडे पाचच्या सुमाराला शिवसेनेच्या नांदेड जिल्हा युवा सेनेच्या अध्यक्षाची हत्या करण्यात आली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

<><><><><>

नागपूर शहरातून अपहरण झालेल्या एका १४ वर्षीय मुलाचा मृतदेह आढळून आला आहे. हनुमान जयंतीच्या रॅलीदरम्यान तो गिट्टीखदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतून बेपत्ता झाला होता. त्याच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

<><><><><>

नंदुरबार जिल्ह्यातल्या तळोदा तालुक्यातल्या जांभई इथल्या शासकीय आश्रमशाळेतून बेपत्ता झालेल्या 14 वर्षीय मुलाला शोधण्यात तळोदा पोलीसांना यश आले आहे. शनिवारी जांभईइथल्या आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळेतून हा विद्यार्थी बेपत्ता झाला होता.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्यातल्या विविध शासकीय कार्यालयांमध्ये कामाच्या वेळेत तंबाखू आणि गुटखा सेवन करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात दंडात्मक कारवाई करण्यात आली. जिल्हा नियंत्रण कक्षाने केलेल्या कारवाईत 1 हजार 880 रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून शासकीय कार्यालयात येताना तंबाखू-गुटखा सोबत बाळगू नये, असं आवाहन करण्यात आलं.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आजचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि पंजाब किंग्ज यांच्यात होणार आहे. कोलकात्यात ईडन गार्डन मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील.

<><><><><>

भंडाऱ्यातल्या तुमसर शहरामध्ये आयपीएल सामन्यांवर ऑनलाईन सट्टा चालविणाऱ्या टोळीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई केली. राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्स या आयपीएल सामन्यावर ते ऑनलाइन सट्टा चालवत होते. या प्रकरणात चार जणांविरोधात गुन्हा दाखल झाला असून त्यांच्याकडून एकूण २६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या रुग्णांकडून अतिरिक्त शुल्क वसूल केल्याप्रकरणी चार वैद्यकीय व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. आयुष्यमान भारत मिशनअंतर्गत उपचार घेतलेल्या रुग्णांकडून १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत ७३ तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यापैकी निकाली काढलेल्या ६९ तक्रारींमध्ये जिल्ह्यातल्या चार रुग्णालय चालक डॉक्टरांवर रुग्णांकडून औषध आणि इंजेक्शनसाठी अतिरिक्त पैसे वसूल केल्याचं निष्पन्न झालं. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यात कुरखेडा तालुक्यातल्या रामगड इथं अंगावर वीज कोसळून काल एक जण मृत्युमुखी पडला. या भागात सकाळी अचानक पाऊस सुरु झाला. यावेळी लग्नमंडपासाठी विद्युत फिटींगचं काम करत असलेल्या तरुणाच्या अंगावर वीज पडून ही दुर्घटना घडली.

<><><><><>

धुळे जिल्ह्यातल्या ११ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदासाठी आणि ४७ ग्रामपंचायतींतल्या ४७ सदस्य पदांसाठी येत्या २८ एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे. त्यासाठी उद्यापासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होत आहे.

//<><><><><>//